
# मराठी साहित्य
## समाज आणि संस्कृती

प्रा. डॉ. विठ्ठल जम्बाले
डॉ. सर्जेराव रणखांब
डॉ. राजेश्वर दुडूकनाळे



अडत व्यापारी शिक्षण संस्था संचलित

# देगलूर महाविद्यालय, देगलूर

## पदवी आणि पद्व्युत्तर मराठी विभाग व मराठी भाषा - साहित्य संशोधन केंद्र

व

## स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्र

# मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती

## * प्रमाणपत्र *

प्रमाणित करण्यात येते की प्रा./डॉ. प्राचार्य डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत,

महाविद्यालय विद्या प्रसारिणी सभेचे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय, लोणावळा,

हे 'मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती' या विषयावर दि. ०२ मार्च २०२३ रोजी आयोजित एक दिवसीय राष्ट्रीय चर्चासत्रामध्ये विशेष अतिथी / सत्राध्यक्ष / साधनव्यक्ती/शोधनिबंध वाचक/सहभागी प्राध्यापक / संशोधक विद्यार्थी म्हणून उपस्थित होते. त्यांनी संत साहित्यातील समाजजीवन या विषयावर शोधनिबंध सादर केला. करिता सदरील प्रमाणपत्र प्रदान करण्यात येत आहे.

| डॉ.मोहन खताळ | डॉ.अनिल चिद्रावार | डॉ.विठ्ठल जंबाले | डॉ.सर्जेराव रणखांब | डॉ.राजेश्वर दुडूकनाळे |
|---|---|---|---|---|
| प्राचार्य | उपप्राचार्य | मराठी विभागप्रमुख व संयोजक | सह-संयोजक | सह-संयोजक |

४४. संत साहित्यातील समाजजीवन........................................२९३
- डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत

४५. संतकाव्यातील परिवर्तनवादी जाणिवा ..............................२९७
- डॉ. राजू सायन्ना बडुरे

४६. संत सोयराबाई यांच्या अभंगातील समाजजीवन ......................३०३
- डॉ. गणेश शिवाजी मोरेवाड

४७. संत साहित्यातील समाज जीवन........................................३१०
- डॉ. कालिदास गुडदे

४८. भाषा, बोली आणि साहित्य..............................................३१३
- डॉ. केशव पाटील

४९. भाषा शिक्षण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०...................३१९
- डॉ. अर्चनादेवी पंढरीनाथ मोरे

५०. भाषा शिक्षण आणि राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२०...................३२६
- गजानन संग्राम हुंडे

५१. आजचे उच्च शिक्षण आणि मातृभाषा....................................३३३
- डॉ. अंजली टापरे

५२. साठोत्तरी साहित्यातील विविध प्रवाह..................................३३६
- डॉ. दत्ताराम राठोड

# संत साहित्यातील समाजजीवन

– डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत
प्राचार्य, विद्या प्रसारिणी सभेचे कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालय,
लोणावळा, रेल्वे स्टेशनजवळ, ता. मावळ, जि. पुणे.

**प्रास्ताविक**

संत साहित्य या शब्दाची परिभाषाच मुळी 'संत लिखित काव्य' अशी करता येते. मराठी काव्याच्या इतिहासात संतांनी काव्यप्रभात केली. पंतांनी माध्यान्हीचे तळपते संस्कृतप्रचूर पंडितीकाव्य रचले तर, तंतांनी पोवाडे, लावणीद्वारे लोकरंजन घडविले.

संत काव्याचा आत्मा हा लोकोद्धाराचा होता. त्यांनी समाजाला पटेल, रुचेल, पचेल अशा काव्यरचना करून मराठी साहित्याची समृद्ध परंपरा सुरू केली. संतांचे साहित्य हे समाज जीवनाशिवाय व्यक्तच होऊ शकत नव्हते. तत्कालीन समाजजीवन धर्माधारे भक्तिमार्गाचा पाया रचून काव्यात्म उद्धाराचा कळस त्यांनी उभा केला. समाज जीवनात माजलेले कलह, देवी-देवतांचे स्तोम, सामाजिक अराजकता, जीवनातील विमनस्कता, खिन्नता, दुःख यांची होळी करत त्यांनी प्रबोधन घडवले. 'देव पुजुनी पहावा' अवघा विठ्ठल एक व्हावा यासाठी विपरीत परिस्थितीत त्यांनी समाजजीवन घडविले. त्यांचे हे कार्य या शोधनिबंधात मांडले आहे.


**बीजशब्द :** संत साहित्य, लोकोद्धार, समाज जीवन, सामाजिक प्रतिभा.

**समाज जीवन म्हणजे काय?**

कोणतीही व्यक्ती एकटी जन्माला येते आणि एकटीच जाते. असे असले तरी त्या व्यक्तीचे जे जे धागे गुंतलेले असतात व ज्या गोष्टी, घटनांशी जुळलेले असतात त्याला समाज असे म्हणता येईल. व्यक्तीसमुदाय म्हणजे समाज. पण व्यक्ती आणि समाज यांचा परस्पर संबंध हा सूक्ष्म घटकांनी जोडलेला असतो. व्यक्तीचे समग्रजीवन म्हणजे त्याचे सामाजिक जीवन होय. अनेक व्यक्तींच्या परस्परांतील सहसंबंधातून सामाजिक जीवन बनते.

समाजाचा पाया हा व्यक्ती असला तरी त्यामध्ये स्त्री-पुरुष, प्रौढ, वृद्ध, लहान मुले-मुली, विविध समाजातील गट, संस्था, संघटना यांचा समावेश होत असतो. त्यांच्या परस्परांतील देवाण-घेवाण, व्यवहार, त्यासाठी लागणारी साधने,

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION



March- 2022

E-ISSN : 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

International E-Research Journal

Peer Reviewed, Referred & Indexed Journal

Issue -290

Guest Editor
Dr. Suresh S. Bakare
Principal, Shri Dnyanesh Mahavidyalaya,
Nawargaon, Dist. Chandrapur
Maharashtra, India.

Executive Editors
Dr. Gajanan Kortalwar (Head, Dept. of Marathi)
Mr. Durgesh Kshirsagar (Assist. Prof. English)
Dr. Asteek Mungmode (Head, Dept. of Economics)
Shri Dnyanesh Mahavidyalaya,
Nawargaon, Dist. Chandrapur
Maharashtra, India.

Chief Editor : Dr. Dhanraj Dhangar

For Details Visit To : www.researchjourney.net

Swatidhan Publications

'RESEARCH JOURNEY' International E- Research Journal
Issue - 290 : Multidisciplinary Issue
Peer Reviewed Journal
E-ISSN : 2348-7143
March-2022

# संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा

डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत
प्रभारी प्राचार्य
व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲन्ड कॉमर्स, लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे, पिन 410 401,
महाराष्ट् राज्य, फोन नंबर 9226852552
इ मेल आयडी bhagatsir.kp@gmail.com

**प्रास्ताविक :**

संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा या विषयावर शोधनिबंध सादर केला आहे. यात संत साहित्याच्या पूर्वपीठिकेपासून मध्ययूगीन काळातील संत साहित्याचे विविधांगी झालेल्या संशोधन व संशोधकांचा थोडक्यात आढावा यात घेतला आहे.

संत साहित्य हे कालातीत असल्यामुळे आज पाचशे वर्षा नंतरही संत साहित्या वर अभ्यास होत आहे. या अभ्यासाला नव्या दिशा लाभण्यासाठी काही संसाधने आधूनिक बदल सुविधा यांचा वापर करून संशोधन होणे गरजेचे आहे. जागतिक पातळी वर संत साहित्याची उपयुक्तता व मूल्यात्मकता आजही अधोरेखित केली जाते. म्हणून संत साहित्य समाज यांचा परस्पर संबंध स्पष्ट करण्यासाठी नव्या संशोधनाची नवी दिशा यात शोधली आहे.

**संत साहित्याच्या संशोधनाची पूर्वपिठीका :**

मराठी वांड.मयाच्या संशोधनाला खरी चालना मिळाली ती 19 व्याशतकात. पाश्चात्य धर्मोपदेशकांनी देशीय लोकांचे हस्तलिखित काव्य मुद्रणकलेच्या आधारे जतन करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामध्ये डॉ. विल्सन, एलफिस्टन, मालकम इत्यादींच्या कार्यातील मराठी भाषेचा इतिहास, वांड.मयाच्या संशोधनाला चालना मिळाली.

एतदेशीय स्वरूपात तात्या गोडबोले, माधव डुकले यांनी संतकवींच्या काव्यरचना संग्रहित करून मासिकात छापल्या. प्राचीन वांड.मय संग्रहित करून संशोधनपर ग्रंथ प्रकाशित करणेची दिर्घ परंपरा वि. का. राजवाडे, वि. ल. भावे यांचे पासून थेट शं. गो. तुळपुळे इत्यादीं पर्यत सुरू झाली. यामध्ये संत कालिन सामाजिक परिस्थिती, भाषा, पाठशुध्दप्रती, पंथीयदृष्टी, संत जीवन चरित्र उपलब्ध झाले. संत साहित्याच्या संशोधनाला चालना मिळाल्यामुळे पंडित कवी व शाहिरी वांड.मयालाही या काळात संशोधनाची दिशा लाभली.

स्वातंत्र्योत्तर काळात महाराष्ट्रात विद्यापीठांच्या स्थापन झाल्या. त्यामुळे विद्यापीठांमध्ये संत साहित्यावर प्रबंधात्मक लेखन झाले. यात ल. रा. पांगारकर, श्री. म. वर्दे, श्री य. न. केळकर, श्री म. ना. सहस्त्रबुध्दे, श्री रा. श्री जोग इत्यादींनी तुलनात्मक, रसग्रहणात्मक, चिकित्सक संशोधन केले. पुढे संशोधनाच्या दिशा व वाटा विस्तृत होत गेल्या. संतांची धर्म संस्कृती तत्कालीन लोकश्रध्दा, प्रतिके, प्रतिमा, माध्यम लोकरंजन इत्यादी अनेक पैलूवर द. भि. कुलकर्णी, रा. चि. ढेरे, यू. म. पठाण, अ. ना. देशपांडे, सरोजिनी बाबर, प्रभाकर मांडे, इत्यादी अनेकांनी संत साहित्याच्या विद्यापीठ स्तरावरील प्रबंध स्वरूपातून संत साहित्याला नवे आयाम दिले.

संत साहित्य संशोधनाच्या पूर्वपीठिकेमध्ये जुन्याकाळातील जी जी हस्तलिखिते, बाड, लिखाण उपलब्ध होत गेले. त्याचा उपयोग मुद्रण करणे करिता इतकाच दिसुन येतो. पोथ्या, पुराणे छापून त्याचे जतन करणे हा प्रारंभिक हेतू होता. मुद्रणकलेमुळे ग्रंथांच्या प्रती छापणे, त्या प्रती वाचकांच्या हाती सोपविणे सोईचे झाले. त्यातून अभ्यासकांची संख्या वाढली. पाठचिकित्सा स्वरूपात असणारा हा अभ्यास पुढे तुलनात्मक, वर्णनात्मक,

Bhartiya Shikshan Sanstha's

# SHRI DNYANESH MAHAVIDYALAYA, NAWARGAON

Dist. Chandrapur (MS)
NAAC Re-accredited with A grade
www.dmvn.ac.in

# Certificate

Two Day National Level E-Conference
on
## Research in the Humanities: New Trends, Motives, Scope and Applications
(21 and 22 March 2022)

This is to certify that

Dr Chandrashekhar A Bhagat

of VPS COLLEGE OF ARTS SCIENCE AND COMMERCE LONAVALA

Participated in the e-conference and contributed a paper entitled संत साहित्यातील संशोधनाच्या नव्या दिशा.

| Dr S S Bakare | Dr G S Kortalwar | Mr D R Kshirsagar | Dr A T Mungmode |
|---|---|---|---|
| Principal | Coordinator | Coordinator | Coordinator |

18 ✓

January, 2022
Volume-6, Issue-11
ISSN 2456-558X

# HEMCHANDRACHARYA INTERNATIONAL E JOURNAL OF RESEARCH

Most Referred & Peer Reviewed
Multi Disciplinary E Journal of Research

**Chief Editor**

**Dr. Dinesh R. Chavda**
**(M.com., B.ed.,GSET.,M.phil.,Ph.D)**
Assistant Professor,
**(Accountancy)**
**Department of Commerce & Management,**
**Bhakt Kavi Narsinh Mehata University,**
**Junagadh, Gujarat, (India)**

CO-EDITOR
**P. R. Sharma**

Director
**Dr. Rajeshkumar A. Shrimali**

2021-2022

(2)

# Hemchandracharya International E - Journal of Research

Most Referred & Peer Reviewed Multi Disciplinary E-Journal of Research

## Certification of Publication

The Board of

Hemchandracharya International E - Journal of Research is hereby awarding this certificate to

**Dr. Chandrashekhar Atmaram Bhagat**

In recognition of the publication of the paper entitled

**“कोरोनाच्या जागतिक आपत्तीमुळे महाराष्ट्रातील शिक्षणव्यवस्थेवर झालेला परिणाम”**

Published In Hemchandracharya International E - Journal Of Research, UGC Approved ISSN: 2456-558X Published in Volume 6, Issue 11, January 2022.

**EDITOR IN CHIEF**

**Certificate No.: 6110122103**

# 73 कोरोनाच्या जागतिक आपत्तीमुळे महाराष्ट्तील शिक्षणव्यवस्थेवर झालेला परिणाम

**Dr. Chandrashekhar Atmaram Bhagat**
Principal
V. P. S. College of Arts, Science and Commerce,
Lonavala, Taluka Mawal, District Pune
E Mail id : bhagatsir.kp@gmail.com

प्रास्ताविकः

कोरोनाच्या जागतिक आपत्तीमुळे महाराष्ट्ाच्या शिक्षण पध्दती वर झालेल्या परिणामांचा या शोध निबंधात अभ्यास व सविस्तर उहापोह करणेत आलेला आहे. या शोध निबंधाची अभ्यास पध्दती ही तुलनात्मक स्वरूपाची आहे. महाराष्ट्ातील पारंपारिक शिक्षण व्यवस्था आणि कोरोना काळातील आॅनलाईन शिक्षण व्यवस्था या दोन्हींची मांडणी सर्व प्रथम केली आहे. या शोध निबंधातुन कोरोनो उत्तर काळात केवळ पारंपारिक शिक्षण पध्दतीचा वापर न करता इंटरनेट वर असणा-या विविध संसाधनांचा शिक्षण पध्दतीत उपयोग केल्यास विद्याथ्र्यां करिता आजचे शिक्षण कसे प्रभावी ठरेल हे स्पष्ट केले आहे. आजच्या काळातील विद्यार्थी हे घरात बसुन मोबाईल च्या माध्यमातून झूम अॅप, गुगल मिट, यू टयुब, लाईव्ह व्हिडीओ, नवीन ब्लाॅग्ज, वेबसाईटस, विकीपिडीया या साधनां द्वारे आॅनलाईन शिक्षण घेत आहेत. त्यांचे शिक्षण या पेक्षाही भविष्य काळात अत्यंत प्रभावी होउ शकते. त्या करिता या संशोधनाची उपयुक्तता आहे.

बीज शब्दः कोरोना, शिक्षण व्यवस्था, पारंपारिक, आधुनिक वेबसाईटस

## कोरोना एक जागतिक आपत्ती :

कोविड - 19 हा एक विषाणू आहे. विषाणू म्हणजे विषयुक्त अणु होय. त्याचा आकार सत्तर ते ऐंशी नॅनोमीटर इतका सूक्ष्म आहे. (नॅनोमीटर म्हणजे एका मीटरचा एक अब्जावा भाग) मानवी केसाची जाडी साधारण ऐंशी हजार नॅनोमीटर असते. यावरून कोविड व्हायरसच्या सूक्ष्मतेची कल्पना आपल्याला करता येईल. या सूक्ष्मातीसूक्ष्म विषाणूने आज जगातील एकशे पंच्याऐंशी पेक्षा जास्त देशातील 3.52 करोड लोकांना लागण झाली आहे. या विषाणूमुळे जगातील सुमारे पाचलाख लोक मृत्युमुखी पडले आहेत. त्यामुळे जागतिक स्तरावर कोरोना व्हायरसची भिती सर्वत्र निर्माण झाली

(SJIF) Impact Factor-8.575
ISSUE No- (CCCXVIII) 348
ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

Multidisciplinary International Research Journal

May -2022

## 'Role of Social Sciences in Contemporary Society'




Prof. Virag.S.Gawande
Chief Editor
Director
Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

Prof. Sujata Awati
Editor
The New Miraj Education Society's
Kanya Mahavidyalaya, Miraj

Aadhar International Publication
For Details Visit To : www.aadharsocial.com
© All rights reserved with the authors & publisher

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575, Issue NO, 348(CCCXLIX) B
ISSN : 2278-9308
May, 2022

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्रियांचे योगदान — लेफ्ट. डॉ. अर्चना टाक | 1 |
| 2 | स्वातंत्र्याची ७५ वर्ष — सहा. प्रा. अस्मिता संजय कोडग | 4 |
| 3 | 'हॅन्डबॉल खेळाडूंच्या वेग या घटकावर टायर प्रशिक्षणाचा होणारा परिणाम: एक अभ्यास' — प्रा. बाबासाहेब म्हाळू सरगर ,डॉ. सुनिल दत्तात्रय चव्हाण | 7 |
| 4 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे राष्ट्रीय सुरक्षेबाबतचे विचार — प्रा. बाबासाहेब शात्रू पाटील | 12 |
| 5 | प्रसूतीपूर्व आणि प्रसूतीनंतरच्या तंदुरुस्तीसाठी विशेष परिस्थितींमध्ये व्यायामाचे नियम आणि व्यायामाची पद्धत. — डॉ.भारत राजाराम चालसे | 14 |
| 6 | आदिवासींचे सण व उत्सव — भोई रविंद्र रतिलाल | 19 |
| 7 | सामाजिक समस्या, लिंगभाव आणि समाज — प्रा. बिजली श्रीपाल दडपे | 22 |
| 8 | राजर्षि शाहूंची कोल्हापूर संस्थानातील कामगार विषयक भूमिका — प्रा. डॉ. दत्तात्रय पांडुरंग खराडे | 25 |
| 9 | लिंग,लिंगभाव आणि हिंसाचार — दिपाली शंकर वाघमारे | 29 |
| 10 | छत्रपती शाहू महाराज यांचा सामाजिक न्यायाचा विचार डॉ. अण्णासाहेब हरदारे | 33 |
| 11 | समकालीन समाज आणि संत साहित्यातील सामाजिक विज्ञान — डॉ. चंदशेखर आत्माराम भगत | 36 |
| 12 | शाहू महाराजांचे महिला सक्षमीकरणातील योगदान — डॉ. गौतम नामदेव ढाले | 40 |
| 13 | सामाजिक चळवळींचा चिकित्सक अभ्यास — प्रा. डॉ. गंगाधर बालू चव्हाण | 44 |
| 14 | शिक्षण व शारीरिक शिक्षणाची कोरोना काळातील भूमिका — डॉ.महादेव सुखदेव सुर्यवंशी | 47 |
| 15 | कोविड–१९ चा भारतीय उद्योगांवरील परिणाम डॉ.तेजस्विनी बी. मुडेकर | 51 |
| 16 | महिलांच्या सर्वांगीण विकासात क्रीडा व शारीरिक शिक्षणाची भूमिका :एक अभ्यास — डॉ. प्रिया प्रकाश टेळे | 55 |
| 17 | गुणग्राहक राजा छत्रपती शाहू महाराज — डॉ रामदास वैद्य | 60 |
| 18 | जातीव्यवस्था व अस्पृश्यता – डॉ. बाबासाहेब आंबेडकर — डॉ. सुरेवाड संजय गंगाराम | 63 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.575,Issue NO, 348 (CCCXLIX ) B
ISSN : 2278-9308 May, 2022

# समकालीन समाज आणि संत साहित्यातील सामाजिक विज्ञान

डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत
प्रभारी प्राचार्य व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे, पिन ४१० ४०१, महाराष्ट्र राज्य, फोन नंबर ९२२६८५२५५२
इ मेल आयडी. bhagatsir.kp@gmail.com

प्रास्ताविक :

समकालीन समाज आणि संत साहित्यातील सामाजिक विज्ञान या शोधनिबंधामध्ये समकालीन समाज स्वरूप आणि व्याप्ती स्पष्ट केलेली आहे. संत साहित्य हे प्राचीन साहित्य असले तरी त्यामध्ये उल्लेख केलेल्या सामाजिक विज्ञानाच्या विषयांचे सोदाहरण स्पष्टीकरण यात मांडले आहे. यासाठी आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ व अन्य साहित्य याचे उल्लेख शेवट स्पष्ट केलेले आहेत. संत साहित्यातून सामाजिक विज्ञान केवळ कालमर्यादित न राहता समकालीन समाजाला ते कसे उपयुक्त आहे याचे विवेचन यातून मांडले आहे.

बीजशब्द : संत साहित्य, सामाजिक विज्ञान, समकालीन, समाजशास्त्र, मानसशास्त्र.

समकालीन समाजः स्वरूप आणि व्याप्ती :

समकालीन हा शब्द कालदर्शक आहे. यातील 'सम' हा शब्द सोबत, समानता या अर्थाने वापरला जातो. एका विशिष्ट कालखंडात जेव्हा व्यक्ती – व्यक्तीत घटना, विचारांत कृतीमध्ये समानबदल घडतात तेव्हा त्यास समकालीन असे म्हणता येईल. समकालीन कालखंडात परस्परांवर होणारा परिणाम, जाणिवा, मते यातून त्या काळातील लोकांची मानसिकता, वैचारिकता बदलत असते. या बदलाचे त्या काळातील कला साहित्य संस्कृतीतून स्वरूप व्यक्त होत असते. म्हणून समकालीन ही संकल्पना अत्यंत महत्वाची मानली जाते.

समकालीन समाज म्हणजे सद्यस्थितीतील समाज. समाज ही संकल्पना अतिशय व्यामिश्र आहे. व्यक्ती समूदायातील परस्पर संबंधांना समाज असे स्थूलपणे म्हणता येईल. परंतु सामाजिक शास्त्रानुसार समाज हा एक सहनशील व सहकारी सामाजिक समूह असून त्यातील सभासदांनी एकमेकांतील आंतरक्रियेद्वारे आप्त संबंध विषयक संघटित संरचना विकसित केलेली असते. त्यास समाज असे म्हणता येते. समाजातून प्रत्येक व्यक्तीचे निराळेपण व्यक्त होत असते. एका व्यक्तीपेक्षा दुसरी व्यक्ती वेगळी वैशिष्ट्यपूर्ण असते. प्रत्येक व्यक्तीतील परस्परांच्या भावना, प्रेरणा, हेतू, उदिष्टे, विचारमूल्ये भिन्न असतात. तरीही त्यात आंतरक्रिया घडत असतात. म्हणून समाज ही संकल्पना तयार होते.

समकालीन समाजाचा अभ्यास करताना कला, साहित्याचा विचार प्रथम करावा लागतो. कारण साहित्य हा समाजाचा आरसा आहे. साहित्यातून व्यक्त होणारे जीवनाशय, अविष्कार, प्रवृत्ती यांना सामाजिक संदर्भ असतात. आपण जेव्हा असे म्हणतो की,'आजचे सामाजिक जीवन बदलले आहे' तेव्हा त्यात समाजातील समकालीन वस्तू, सुधारणांचा उल्लेख अप्रत्यक्षपणे अभिप्रेत असतो. मराठी साहित्यातील उदाहरण घ्यायचे झाल्यास मराठी साहित्याच्या इतिहासात समकालीन साहित्याचा कालखंड हा १९९० ते २०२० पर्यतचा मानतात. नव्वदोत्तर काळात देशात जागतिकीकरण झाले. उदारीकरण, खाजगीकरण झाले. त्याचा परिणाम समाज वर्तनावर मोठया प्रमाणात झाला. या काळात व्यक्ती पेक्षा पैशाला महत्व वाढले. बाजारात बहुराष्ट्रीय कंपन्या, संगणक, इंग्रजी माध्यमांच्या शाळा स्थापन झाल्या. व्यक्तिगत जीवनात स्मार्टफोन, सोशलमिडिया, वॉटसअॅप, फेसबुक, मॉडेलिग इत्यादीचा उपयोग होत गेला. घरे कमी होउन इमारती वाढल्या. दुकानांची जागा मॉलने घेतली. घरपोच हातात खाद्यपदार्थ, शितपेये बाटलीबंद पाणी मिळू लागले. हया सुधारणा इतक्या झपाटयाने दहा ते वीस वर्षात झाल्या की माणसाला माणसाशी संवाद, विचार विनिमय करायला अवधी मिळाला नाही. रस्ते वाहनांनी भरले गेले. परिणामी समाजजीवन दुभंगले गेले. पैसा हेच जीवनाचे उदिष्ट बनले. सामाजिक जाणीवा घसरत गेल्या. नैतिकमूल्यांचा –हास होत गेला. जीवनात चरितार्थाचे प्रश्न उभे राहून सामाजिक बदलांचा दबाव सामान्य व्यक्तीच्या जीवनशैलीवर वाढत गेला. सामाजिक, राजकीय, कौटुंबिक जीवनातील अस्थिरता

# तिफण

वर्ष : १३ वे । अंक १ला । एप्रिल-मे-जून - २०२२




कुळवाडीभूषण

# छत्रपती शिवाजी महाराज

विशेषांक

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेखाचे शीर्षक / लेखकाचे नाव | पृ. क्र. |
|---|---|---|
| १. | छत्रपती शिवाजी महाराजांचा उद्योग व व्यापारासंदर्भातील दृष्टिकोन<br>- डॉ. मीना वडगुळे | १ - ३ |
| २. | छ. शिवाजी महाराजांचे अमात्य व जकातविषयक धोरण<br>- डॉ. सुनील अण्णा गोरडे | ४ - ७ |
| ३. | सभासद बखरीतील छत्रपती शिवाजी महाराज<br>- डॉ. रमेश औताडे | ८ - १० |
| ४. | छत्रपती शिवाजी महाराजांचे प्रशासन<br>- प्रा. डॉ. जयकुमार चंदनशिवे | ११ - १३ |
| ५. | छत्रपती शिवाजी महाराजांचे बांधकाम व राजस्व धोरण : एक चिकित्सक अभ्यास<br>- डॉ. ज्ञानेश्वर जिगे | १४ - १६ |
| ६. | छत्रपती शिवाजी महाराजांचा सामाजिक दृष्टिकोन<br>- डॉ. सतीश मस्के | १७ - २० |
| ७. | श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी कविता<br>- डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत | २१ - २४ |
| ८. | शिवकालीन समाजव्यवस्थेचा समाजशास्त्रीय अभ्यास<br>- प्रा. डॉ. संजय गंगाराम सुरेवाड | २५ - २९ |
| ९. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. अनिल बळीराम बांगर | ३० - ३४ |
| १०. | न्यायप्रिय राजा : छत्रपती शिवाजी महाराज यांचे कार्य<br>- प्रा. डॉ. दादासाहेब गिऱ्हे | ३५ - ३७ |
| ११. | छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी बखर<br>- प्रा. डॉ. वाल्मीक शंकर आढावे | ३८ - ४१ |
| १२. | शिवाजी महाराजांची युद्धनीती<br>- प्रा. योगेश गुलाबराव भदाणे | ४२ - ४४ |
| १३. | छत्रपती शिवाजी महाराज व्यक्तित्व आणि कार्य<br>- डॉ. विठ्ठल केदारी | ४५ - ४८ |
| १४. | छत्रपती शिवाजी महाराजांची आरमारविषयक भूमिका<br>- डॉ. भूषण गोविंद फडतरे | ४९ - ५४ |
| १५. | छत्रपती शिवाजी महाराजांचा स्त्रीविषयक दृष्टिकोन<br>- प्रा. पालवे रामनाथ सूर्यभान | ५५ - ५८ |



# श्री छत्रपती शिवाजी महाराज आणि मराठी कविता

- डॉ. चंद्रशेखर आत्माराम भगत
प्रभारी प्राचार्य, व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स अॅण्ड कॉमर्स,
लोणावळा, ता. मावळ, जि. पुणे - ४१० ४०१
मो. ९२२६८५२५५२, ई-मेल : bhagatsir.kp@gmail.com

छत्रपती शिवाजी महाराज हे केवळ राजे नव्हते, तर ते परकीय आणि परधर्मीय राजसत्तांना थोपवून हिंदू पतशाही साम्राज्य निर्माण करणारे 'श्रीमंत योगी' होते. त्यांनी महाराष्ट्राला स्थैर्य देऊन जनतेला सुखी केले. श्री छत्रपती शिवाजी महाराजांना बारा भाषा अवगत होत्या. त्यांनी राज्यकारभारात मराठी भाषा सक्तीची केल्यामुळे कार्यालयीन मराठी भाषेची पायाभरणी शिवकालात झाली, असे म्हणता येईल.

मराठी काव्याची परंपरा मुकुंदराजांपासून सुरुवात झाली तरी आजपर्यंत अनेक कवींनी काव्यरचना केलेल्या आहेत. शिवकालीन मराठी राजकवी कविभूषण यांनी सोळाव्या शतकात शिवाजी महाराजांवर दीर्घ काव्यरचना केली. तेव्हापासून आज बावीसाव्या शतकातील 'चारोळी' या काव्य प्रकारापर्यंत हजारोंनी श्री छत्रपती शिवाजी महाराजांवर, जीवनचरित्र आणि पराक्रमावर, शौर्यावर कविता केलेल्या पाहायला मिळतात. महाराष्ट्राबाहेरील तामिळ भाषेतील कवी सुब्रह्मण्य भारती, तेलगू कवी कोमाराजू व्यंकट लक्ष्मणराव, गुजराती झवेरचंद्र मेघाणी, हिंदीतील केदारनाथ मिश्र इत्यादींच्या शिवाजी महाराजांवरील काव्यरचना प्रसिद्ध आहेत. मराठीतील निवडक कवितांचा आढावा यात घेतलेला आहे.

**बीजसंज्ञा -** श्री छत्रपती शिवाजी महाराज, काव्य, कविता, शायरी, शिवकाल, प्राचीन, आधुनिक, नवकवी

भाषा हे विचार प्रकटीकरणाचे माध्यम आहे. भाषेतून आपले विचार मांडताना ते अधिक सुंदर, सुबोध, प्रौढ दिसावेत याकरिता आपण काव्यात्मक रचना करतो. काव्यात नाद, अर्थ आणि ध्वनी असतात. म्हणून काव्याला लयबद्धता, तालबद्धता आणि माधुर्य असते. त्याचप्रमाणे काव्याचे प्रसाद, माधुर्य, ओज हेच तीन गुण प्रमुख मानले जातात. म्हणूनच 'रमणीयार्थ प्रतिपादकः शब्दः काव्यम' अशी काव्याची व्याख्या करतात. आधुनिक काळात काव्याला कविता हा पर्यायी शब्द रूढ आहे. काव्य या रचना प्रकाराची व्याप्ती आणि इतिहास इतका प्राचीन आहे की, पहिली कविता (पद्य) केव्हा व कोणी लिहिली, हे सांगता येणार नाही. मराठी भाषेत आजवर लाखो कविता वाचायला मिळतात. त्यातील विषय, तत्त्वज्ञान, परंपरा वैविध्ये पाहायला मिळतात. मराठी भाषेसंदर्भात विचार करायचा झाल्यास मराठी भाषेवर समाज, संस्कृती, वातावरणापेक्षाही राजकीय स्थित्यंतराचा प्रभाव मोठ्या प्रमाणात झालेला आढळतो. मराठी भाषा ही राजकीय राजवटीनुसार बदललेली दिसते. राजकीय राजवटींचा परिणाम भाषेप्रमाणेच राज्यक्रांती, धर्मक्रांती, समाजक्रांती यावरही होत गेला. त्यातूनच विचारक्रांती घडून भाषिक बदल झाले. काळानुरूप भाषेची रूपे काव्याची ओजस्विता, प्रतिभा, अलंकार, वृत्त आणि छंद बदललेले पाहायला मिळतात. या बदलातूनच आजची कविता जन्माला आलेली आहे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या कवितांचा अभ्यास करताना प्रामुख्याने मराठी वाङ्मयाच्या इतिहासाचे खालील टप्पे मांडता येतील -

१) शिवकालीन मराठी : इसवी सन १६०० ते १७००

२) पेशवेकालीन मराठी : इसवी सन १७०० ते १८००

३) इंग्रजकालीन मराठी : इसवी सन १८०० ते १९००

४) आधुनिक कालखंड : इसवी सन १९०० ते २०००

५) अर्वाचीन कालखंड : इसवी सन २००० ते आजपर्यंत.

वरील सुमारे ५०० वर्षांच्या कालखंडात छत्रपती शिवरायांच्या जीवनचरित्रावर, कर्तृत्वावर, त्यांच्या गुणपैलूंचे दर्शन घडविणाऱ्या लाखो कविता निर्माण झाल्या आहेत. या शोधनिबंधात त्यांचा आढावा घेणे म्हणजे वटवृक्षाची पाने

Impact Factor - 8.572 (SJIF)
ISSN - 2278 -9308

FEBRUARY 2022
ISSUE NO. (CCCXXXVI) 336

# B.Aadhar

Peer - Reviewed & Refereed Indexed

**MULTIDISCIPLINARY INTERNATIONAL RESEARCH JOURNAL**




संपादक

डॉ. जगदीश साबू | डॉ.शिवाजी नागरे | डॉ.श्रीकृष्ण काकडे

**This Journal is Indexed in**

Scientific Journal Impact Factor (SJIF)
Cosmos Impact Factor (CIF)
International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit to : www.aadharsocial.com

Aadhar PUBLICATIONS

| | | |
|---|---|---|
| 19 | आदिवासीकवितेतील बदलते जीवनदर्शन प्रा.चिंतामण धिंदळे | 97 |
| 20 | मराठी कवितेतील नवजाणिवा डॉ. प्राजक्ता रामदास शित्रे | 102 |
| 21 | १९९० नंतरच्या खानदेशी बालसाहित्यातील मराठी कथा व कविता यांच्या नवजाणिवा प्रा.श्रीमती पाटील शालिनी सिताराम | 110 |
| 22 | 'मेलं नाही अजून आभाळ...' मधील नवजाणिवा डॉ. मधुकर बैकरे | 115 |
| 23 | स्त्रीवादी कवितेतील नवजाणीवा प्रो. डॉ. चारुशिला राजेश्वर रुमाले | 121 |
| 24 | मराठी साहित्यातीलआर्षमहाकाव्यांची उपजीव्यता (विशेषतः 21 व्या शतकातील मराठी कादंबरीच्या संदर्भात) डॉ. जयश्री सकळकळे | 126 |
| 25 | जागतिकीकरणातील गझल प्रा. डॉ. अनिल भीमराव भगत | 129 |
| 26 | भाषा, समाज व संस्कृती बदलाचे साहित्यातील चित्रण डॉ. संजय शेजाव | 133 |
| 27 | भाषा समाज व संस्कृती बदलाचे साहित्यातील चित्रण डॉ. शंकर शिवाजी मुंडे | 136 |
| 28 | जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरी डॉ. सुधीर बब्रुवान मोरे | 141 |
| 29 | मराठी कादंबरीतील नवजाणिवांचा आविष्कार प्रा. डॉ. गणेश लहाने | 146 |
| 30 | शिक्षण सेवकाच्या संघर्षमय जीवनाचा वेध घेणारी कादंबरी : शिक्षणसेवक : कृष्णा डोळसे प्रा.पुरुषोत्तम एस. निर्मळ | 150 |
| 31 | एसईझेड - कृषिसंस्कृतीच्या उद्ध्वस्ततेचे चित्रण डॉ.सुभाष ज्ञानबा गव्हाणे | 155 |
| 32 | मराठी कादंबरीतील बदलत्या जीवनजाणिवा प्रा.डॉ.शिवाजी नी. नागरे | 159 |
| 33 | समकालीन मराठी कवितेतील ग्रामीण संवेदन :'मास्तर मातीचे' डॉ.पद्माकर डिगांबर वानखडे | 163 |
| 34 | नरेंद्र इंगळे यांच्या कादंबरीतील नवजाणिवा प्रा.डॉ. शिवाजी नागरे / प्रा. विठ्ठल हरिभाऊ सपकाळ | 167 |
| 35 | एकविसाव्या शतकातील मराठी ग्रामीण कादंबरीचे बदलते स्वरूप प्रा.डॉ.जगताप यु.एस | 169 |
| 36 | २१ वे शतक आणि मराठी ग्रामीण कादंबरी प्रा. उमेश मुंढे | 172 |
| 37 | मराठी साहित्यातून व्यक्त होणा–या कोरोना साथीच्या नवजाणीवा डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत | 177 |
| 38 | कोरोनाकालीन मराठी कविता : नव जाणिवाविष्कार डॉ. भास्कर सुभाष पाटील | 183 |
| 39 | मराठी साहीत्यातील नवता व परिवर्तने प्रा. महेंद्र खुशालगीर गिरी | 192 |
| 40 | महाराष्ट्रातील आदिवासींचे सांस्कृतिक, सामाजिक व आर्थिक जीवन प्रा. डॉ. विठ्ठल जीवतोडे | 195 |

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.572 Issue NO, 336 (CCCXXXVI)
ISSN : 2278-9308
February, 2022

# मराठी साहित्यातून व्यक्त होणा—या कोरोना साथीच्या नवजाणीवा

डॉ. श्री चंद्रशेखर आत्माराम भगत
प्रभारी प्राचार्य व्ही. पी. एस. कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स अॅन्ड कॉमर्स, लोणावळा, तालुका मावळ, जिल्हा पुणे, पिन ४१० ४०१,

सारांश :

मराठी साहित्यामध्ये सन १९६० नंतर विविध साहित्यप्रकार उदयाला आले. त्यामध्ये ग्रामीण साहित्य, दलित साहित्य, स्त्रीवादी साहित्य इत्यादी प्रवाह दिसतात साहित्य हा समाजाचा आरसा साहित्यातून समाजात झालेल्या बदलांचे चित्रण तसेच वर्णन वेगवेगळया कालखंडात वास्तवादी स्वरूपात पहायला मिळते.

मराठी साहित्यातून प्रत्येक कालखंडात समकालीनतेचा प्रभाव उमटलेला दिसतो. त्यामुळे मराठी साहित्यात चळवळी, सत्याग्रह, आधुनिकतावाद, औद्योगिकरण, बदलते जीवन, समााजिक बदललेली मुल्ये इत्यादींचा प्रभाव कथा, कादंबरी, काव्य, नाटय, विविध लेख याच्यातून वेळोवेळी पहायला मिळतो.

२१ व्या शतकामध्ये कोरोना ही महामारी जागतिक स्तरावरील होती. कोरोना महामारीवर जगभरातून अनेक लेखक, कवी यांनी वास्तववादी लेखन केलेले आहे. मराठी साहित्यातील कवी, लेखक यांनी मांडलेल्या कथा कादंब—यातून कोरोना महामारीचा समाज जीवनावर झालेला परिणाम आपल्याला यातून पहायला मिळतो. कोरोना महामारीतुन बदललेल्या सामाजिक जाणीवा या शोधनिबंधातून स्पष्ट केलेल्या आहेत. विविध साहित्यप्रकार व समाजातील वास्तव यातून मांडलेले आहेत.

संशोधन पध्दती :

संशोधन ही एक विस्तृत प्रक्रिया आहे. कोणत्याही विषयावरचे संशोधन करतांना काही नियम पाळले जातात. त्यामध्ये नियोजनबध्दता, शास्त्रशुध्दपणा, नेटकेपणा असावा लागतो. संशोधनातून संशोधकाचे उदिष्ट स्पष्ट होणे गरजेचे असते. संशोधनाच्या अनेक पध्दती आहेत. मी मराठी साहित्यातून व्यक्त होणा—या कोरोना साथीच्या नवजाणीवा शोधनिबंधातून समाजात झालेल्या बदलांचा अभ्यास केलेला आहे. याकरिता मराठी साहित्यातील कथा, कादंबरी, काव्य व लेख या साहित्यप्रकारांचा (साधनांचा) अभ्यास करून त्यातून वास्तववादी लेखनाचा संदर्भ घेतलेला आहे. ही वर्णनात्मक संशोधन पध्दती असली तरी साहित्याचा समाजावर होणारा परिणाम व बदलणा—या जाणीवा सोदाहरण स्पष्ट केलेल्या आहेत.

बीज शब्द : सामाजिक जाणीवा, साहित्य, नव प्रवाह, कोरोना, जागतिक महामारी

कोरोनापूर्व जागतिक साथी :

जगाच्या इतिहासात संसर्गजन्य साथीच्या रोगांचा प्रादूर्भाव हा साधारणपणे प्रत्येक शतकात पहायला मिळतो. जुन्या काळामध्ये देवी, कॉलरा, घटसर्प, क्षयरोग, फ्लयू (एनफ्लयूएंझा), प्लेग आणि आता कोव्हिड — १९ इत्यादी साथीचेरोग जगात पसरलेले दिसतात. यातील बरेचसे रोग हे जागतिक स्तरावर पसरल्यामुळे त्यांना 'महामारी' असे घोषित करण्यात आले होते.

जागतिक साथीच्या रोगांमध्ये प्लेगची साथ ही महाभयंकर मानली जाते. चौदाव्या शतकात प्लेगच्या साथीत जगभरातील सुमारे ८० कोटी लोक मृत्यूमुखी पडले होते. या मृत्यूतांडवाचे प्रतिबिंब